# मान्सून रॅली ऑफ नाशिकमध्ये क्लिंटन जॉन सर्वोत्तम

## हितेश शर्मा, पार्थ पटेलचे वर्चस्व, स्कूटर प्रकारात पूजा कारे अव्वल




नाशिक । प्रतिनिधी

मान्सून रॅली ऑफ नाशिक २०२५ मध्ये क्लिंटन जॉन याने ओव्हरऑल गटात वर्चस्व राखत सर्वोत्तम होण्याचा मान पटकावला.

फेडरेशन ऑफ मोटार स्पोर्टस् क्लब ऑफ इंडिया (एफएमएससीआय) च्या मान्यतेने आणि जी फोर स्मार्ट रेसिंग टेक्नोंद्वारा आयोजित नाशिकच्या ग्रेप कौंटीच्या परिसरात घेण्यात आल्या.

इतर गटात हितेश शर्मा,पार्थ पटेलने विजेतेपद मिळविण्याचा मान मिळवला तर उत्सुकतेच्या महिलांच्या स्कूटर गटात पूजा कारे यांनी वर्चस्व राखत सर्वांचेच लक्ष वेधले. या रॅलीचे रविवारी सायंकाळी पारितोषिक वितरण झाले. सुझूकीचे मृदूल देवस्थळी, गणेश लोखंडे, एफएमएससीआयचे समीर बुरकुल, रवी वाघचौरे, सुजीत आघारकर यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिक देण्यात आले. तत्पूर्वी ग्रेप कौंटींच्या परिसरात सकाळी मेहेर हॉटेलचे संचालक वामनराव लोखंडे, पोलिस निरीक्षक मधुकर कड यांच्या हस्ते ध्वज दाखवून रॅलीला सुरूवात झाली. त्यासाठी तीन टप्पे तयार करण्यात आले होते. स्पर्धेत नाशिकच्या स्थानिक चालकांसह राष्ट्रीयस्तरावर प्रतिनिधीत्व करणाऱ्या चालकांचा थरार नाशिककरांना अनुभवता आला, वेगाने धूळ उडवत येणारी वाहने आणि आपल्या दुचाकीवर नियंत्रण करता चालकांचे कौशल्य पहायला मिळाले. वळणावर गाडी नियंत्रण करतांना अनेकांची चांगलीच तारांबळ उडाली. वरूण राजानेही हजेरी लावल्याने पावसाळी रॅलीतील खरा थरार नाशिककरांना अनुभवाता आला. टाळ्या, शिट्या वाजवून दाद देणाऱ्या नाशिककरांनी चालकांचा उत्साह वाढवला. तीन टप्प्यातील ही मान्सून रॅली अनेकांर्थाने वैशिष्ट्यपूर्ण ठरली, किरकोळ दोन तीन जणांचे आक्षेप वगळता, रॅलीचे संयोजन उत्तम होते. या दोन दिवसीय रॅलीसाठी सुझूकी स्पीड सुझूकी, जीएस कस्टमस, ग्रेप कौंटी हे मुख्य प्रायोजक आहे तर कंट्री रौंच, इशा पब्लिसिटी, द फ्लाय मंकी आणि अपोलो हॉस्पिटल हे सहप्रायोजकांची भूमिका बजावत आहे.

### निकाल पुढीलप्रमाणे :

- ओव्हरऑल कॅटेगरी – क्लिंटन जॉन, लौकी पाशे, हितेश शर्मा
- २५० ते ५०० सीसी – हितेश शर्मा, नरेन महाजन, अरोन रेमेडिओस
- क्लास एम ए ते १६५ सीसी – पार्थ पटेल, महेश ठक्कर
- ग्रुप डी १६५ ते २६० सीसी – क्लिंटन जोहन, महेश चौधरी, कुणाल सिंग
- स्कूटर लेडीज क्लास – पूजा कारे, तिशा राजपूत

## वैद्यकीय विद्याशाखा लेखी परीक्षा सुरु

**नाशिक ।** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या तिसऱ्या टप्प्यातील लेखी परीक्षांना नुकतीच सुरूवात करण्यात आली. राज्यातील एकूण ५३ केंद्रावर ही परीक्षा होणार आहे. अभ्यासक्रमांच्या प्रश्नपत्रिका ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे परीक्षाकेंद्रावर पेपर सुरु होण्याआधी यशस्वीरीत्या पाठविण्यात आल्या आहेत तसेच ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे उत्तरपत्रिकांचे स्कॅनिंग करुन तपासण्याची कार्यवाही सुरू आहे. द्वितीय वर्ष अभ्यासक्रम परीक्षेच्या प्रश्नपत्रिका ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे परीक्षाकेंद्रावर परीक्षेच्या दिवशी पाठविण्यात येणार असल्याचे परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू यांनी सांगितले.

## गुणगौरव सोहळा

**नाशिक ।** मविप्र संस्थेच्या वाघ गुरुजी बालशिक्षण मंदिर येथे शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्ता यादीत आलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा पार पडला. याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून मविप्रचे सरचिटणीस नितीन ठाकरे, शहर संचालक लक्ष्मण लांडगे, प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी जाधव, शालेय समिती अध्यक्ष कोशिरे, शालेय समिती सदस्य हिरामण सोनवणे आदी उपस्थित होते.

## आजचे कार्यक्रम

किशोरकुमार जयंतीनिमित्त आशा मेलडी मेकर्स अमरकुमार यांच्यातर्फे छुकर मेरे मनको मैफलीचे आयोजन. स्थळ : प.सा. नाट्यगृह वेळ : सायंकाळी ५.३० वाजता

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे खड्डे, पाणीप्रश्नी धरणे आंदोलन. स्थळ : राजीव गांधी भवन समोर, शरणपूररोड वेळ : सकाळी १०:३० वा.

## थोडक्यात

### काँक्रिट उखडले

**जुने नाशिक ।** स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत गोदावरी नदी परिसरातील दगडी फरशी साईटवर करण्यात आलेल्या सिमेंट काँक्रिटच्या कामावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सामाजिक कार्यकर्ते अंकुश राऊत यांनी या कामाच्या निकृष्ट दर्जावर तीव्र नाराजी व्यक्त करत हे संपूर्ण काम नव्याने करण्याची मागणी केली आहे. त्यांनी सांगितले की, काही ठिकाणी सिमेंट काँक्रिट उखडलेले दिसत असून पहिल्याच पावसात परिसराची अवस्था बिकट झाली आहे.

### कारवाईची मागणी

**नवीन नाशिक ।** दत्त मंदिर चौकातील वाईनशॉप च्या बाहेर ग्राहक रस्त्यावर आपली वाहने पार्क करत असल्याने याठिकाणी मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत आहे. वाहतूक शाखेतर्फे याठिकाणी कारवाईची मागणी वाहनचालकांनी केली आहे.

## निधनवार्ता ...

### वेडू गायकवाड



**इंदिरानगर ।** तळवाडे भामेर (ता. बागलाण) येथील प्रगतीशील शेतकरी वेडू संपत गायकवाड (९५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. वाडीवर्हे माध्यमिक विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक भिला गायकवाड यांचे ते वडील होत.

# शिक्षकांनी संस्कारक्षम विद्यार्थी घडवावेत : कड



नवीन नाशिक । प्रतिनिधी

विद्यार्थी जीवनात विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाचा वापर सकारात्मकतेने करावा. संस्कारक्षम विद्यार्थी घडवण्यासाठी पालक व शिक्षकांनी प्रयत्न करण्याची गरज असल्याचे मत अंबड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड यांनी व्यक्त केले.

कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय येथे शिक्षक, पालक व विद्यार्थी सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कड बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सोपान कुशारे उपस्थित होते. यावेळी मनोगत व्यक्त करताना कड यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी जीवनात चॅलेंजेस स्वीकारावे, नम्रता अंगी बाळगून, संस्कारक्षम विद्यार्थी घडवण्यासाठी पालक व शिक्षक यांनी प्रयत्न करावे. त्यासाठी वास्तविकपणे जगायला शिकवण्याची आवश्यकता आहे. मुलांनी गुन्हेगारी प्रवृत्ती पासून दूर राहावे त्यासाठी चांगली संगत महत्त्वाची आहे. मुलांनी व्यसनाधीनतेपासून दूर रहावे.

अध्यक्ष मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. एस. के. कुशारे यांनी सांगितले की, पालकांनी आपल्या पाल्याचे भवितव्य घडवण्यासाठी सतत जागरूक रहावे.

प्रास्ताविक प्रा. बी. बी. कोतवाल यांनी केले. ज्युनियर कॉलेज प्रमुख प्रा. डी. एम. देवरे यांनी महाविद्यालयात शैक्षणिक सुविधा व उपक्रमांची माहिती देऊन वावरे महाविद्यालयात गरजू व होतकरू विद्यार्थ्यांसाठी डिलिजंट बॅच व त्याची कार्यप्रणाली विशद करून अगदी माफक दरात डिलिजंट बॅचमध्ये शैक्षणिक व नाविन्यपूर्ण असे ज्ञानदान सुरू करण्यात आले असल्याची माहिती दिली. याप्रसंगी ए. आर. भाटे , एम. डी. भोसले यांनी आपले विचार व्यक्त केले. के. व्ही. पाटील व एस. एस. संधान यांनी सूत्रसंचालन केले. आर. जी. पिंगळे यांनी आभार मानले.

याप्रसंगी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते १२ वी कला, विज्ञान व वाणिज्य शाखेत सर्वप्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. विष्णू चौधरी, प्रा. कमलेश पाटील, प्रा. एन. आर. उगले, नांदे, वैभव खंडांगळे यांनी प्रयत्न केले.

# सरकारचा कानाडोळा; बिऱ्हाड आंदोलक वाऱ्यावर



नाशिक । प्रतिनिधी

गेल्या २६ दिवसांपासून आदिवासी विकास भवनासमोर सुरु असलेल्या बिऱ्हाड आंदोलनकर्त्यांचा संयम आता सुटू लागला आहे. उपाध्यक्ष चंद्रशेखर दळवी यांचीही प्रकृती खालावली आहे. या आंदोलनाकडे सरकारने कानाडोळा केल्याने आता आंदोलनकत्यानी कुणाकडे पहावे असा प्रश्न निर्माण झाला आहे.

आदिवासी आश्रमशाळेत काम करणाऱ्या तासिका शिक्षकांसह रोजंदारी कर्मचाऱ्यांना कायम करा, बाह्यस्रोताद्वारे होणारी भरती रद्द करा, यासह विविध मागण्यांसाठी आंदोलन सुरु आहे. माजी आमदार जे.पी.गावित यांनीही आता मोठ्या ताकदीने लढा देऊ असा इशारा दिला. रविवारी सुदाम भोये, फुलाजी बागूल, सागर बागूल, लक्ष्मण गायकवाड, हरिश्चंद्र बागूल, सुरेश बागूल, वसंत बागूल, भारत बागूल यांनी बेमुदत बिऱ्हाड धरणे आंदोलनाला भेट दिली. अन्नधान्य संपत आले असल्याने आता अनेक खेड्यापाड्यातून आंदोलनकर्त्यांना धान्य पोहोचवण्याचे काम सामाजिक क्षेत्रातून सुरु झाले आहे. रविवारी बेंदीपाडा (तालुका कळवण) यांच्या माध्यमातून गावात आंदोलन झाले. आता प्रत्येक गावातून आंदोलन करत प्रत्येक गावातून रेशन पोहोचवावे असेही आवाहन करण्यात आले आहे.

# क्लासिफाईड /सुपरमार्केट


## पाहिजेत

**अनुभवी** ऑफिस अकाऊंटंट आणि टेलीकॉलर पाहिजेत. शिवाजीनगर, सातपूर. मो.8983101066, 9970630713. (06/08-BK-3493)

## विकणे आहे

**गोविंदनगर** हायवे फ्रंट 2000, 4000 स्के.फूट कमर्शियल शॉप विकणे, गंगापूररोड, चांदशी, मखमलाबाद, आडगाव ॲमिनिटी प्लॉट विकणे. 9637915599. (05/08-BK-3600)

## दारुबंदीचा गुरुमंत्र

**द ग्रेट** साईंटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ.पालवे ॲडमिट करा... ।। नका करू... पेशंटला सांगा...।। नका सांगू... पेशंटला आणा... ।। नका आणू... * व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासून १०० टक्के मुक्ती... सर्व सुविधांनी परिपूर्ण : * व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इंजक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपच्चार... ॲडमिट सुविधा... * (विशेष) गरिबांसाठी फीमध्ये सवलत... तर संपर्क : 9552619752. डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (09/01/26) (CRINV-23-24JL/ CRG00555)

## व्यसनमुक्ती

**गॅरंटीने** सोडवा. दारू + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखू + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी. डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. मो. 9552619752. www. drpalve nashamukti kendra.in, १००% रिझल्ट. (09/01/26) (CRINV-23-24JL CRG00554)

## जाहीर नोटीस

मी खालील सही करणार श्रीमती सुशिला कृष्णा आहिरे आज दि. २२/०७/२०२५ रोजी जाहीर करते की माझे पती स्व. कृष्णा बारकु आहिरे यांचे दि. २२/०६/२०२४ रोजी निधन झाल्याने त्यांच्या नावे असलेले वाहन क्र . MH 41V8404 Maruti Suzuki Swift Dzire VDI माझ्या नावावर हस्तांतर करणेकामी मी श्रीमती सुशिला कृष्णा आहिरे प्लॉट नं-३४+३५ राधे रो हाऊस शरयू पार्क-२ अंबिका टेक्सटाईलच्या पाठीमागे नाशिक - ४२२००३ वारसदार ( पत्नी ) म्हणून मी प्रादेशिक परिवहन अधिकारी नाशिक यांच्याकडे अर्ज करीत आहे .सदर वाहन हस्तांतर करणेकामी कोणाची काही हरकत असल्यास ७ दिवसाच्या आत समक्ष भेटून कळवावे अथवा मे. प्रादेशिक परिवहन अधिकारी नाशिक यांच्याकडे लेखी संपर्क साधावा. ७ दिवसानंतर कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाही. कळावे.

सही/- श्रीमती सुशिला कृष्णा आहिरे

## सर्व आजारांसाठी

**जुनाट** सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघेदुखी, चालता, बसता, उठता न येणे, जुनाट संधीवात/चिकन गुनिया, जुनाट ॲलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मूळव्याध, एचआयव्ही, भूक लागत नाही? वजन कमी? थकवा जाणवतोय?, Low CD4 Count? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा- अहमदनगरचे सुप्रसिद्ध डॉक्टर पालवे, वरणगाव. मो.नं. 9552619752. (09/01/26) (CRINV-23-24JL/ CRG00556)

## नावात बदल

My old name MONALI MANGESH GARAD has been changed to new name MONIKA MANGESH GARAD as per Aadhar No. 6145 0045 5742. (04/08)

My old name JAWAJREEYA BANO A.HMEED SHAIKH has been changed to new name JAVERIYA MUJAMIL SHAIKH as per Aadhar No. 4415 3430 4142. (04/08)

## वाचकांना विनम्र सूचना

'देशदूत' वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची देशदूत वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल देशदूत वृत्तपत्र समूहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

जाहिरात दर : ◆ क्लासिफाईड डिस्प्ले रु. ६६/- प्रति स्क्वेअर सेमीसेंटर (कॉलम साईज ३.३ सें.मी.) ◆ ४० शब्दापर्यंतच्या छोट्या जाहिराती रु. १६/- प्रतिशब्द ◆ ३+१ फ्री ◆ क्लासिफाईड डिस्प्ले ३+१ फ्री ◆ कमीत कमी शब्दमर्यादा १० शब्द ◆ हायलाईट बॉक्स रु. १५०/- मात्र (प्रति दिवस) ◆ पोस्ट बॉक्स रु. ३००/- मात्र.

टीप : बाळाचा फोटो प्रकाशित करण्यासाठी रु. १००/- शुल्क आकारले जाईल.

या सदरात केवळ १ ते ५ वर्षादरम्यानच्या बाळाचेच फोटो प्रकाशित केले जातील.

◆ जाहिरात विभाग, दै.देशदूत, एम.जी.रोड, नाशिक. ०२५३- २५७५७१६ ◆नाशिकरोड : प्रतिक आर्केड, शॉप नं. २५, देना बँकेच्या वरती, बिटको पॉईंट. ०२५३-२४६२७५६◆ निफाड : मार्केट कमेटी, व्यापारी संकुल, बसस्टॅण्डशेजारी, गोदावरी प्रिंटींग प्रेसच्या वरती. ०२५५०-२४११००◆दिंडोरी : दिंडोरी कृ.उ.बा. समिती कॉम्प्लेक्स, पंचायत समिती गेटसमोर. ०२५५७-२२२८८८◆ मालेगांव : पांजरपोळ शॉपिंग सेंटर, छ.शिवाजी पुतळ्याजवळ. ०२५५४-२४३४६२२◆सिन्नर : दुसरा मजला, मोतीकमल टॉवर, बसस्थानकासमोर. ०२५५१-२२२१५१. या कार्यालयांमध्ये बाळाचे फोटो स्विकारले जातील.

## आज आपल्या बाळाचा वाढदिवस..




त्यास आमच्या गोड-गोड वाढदिवस शुभेच्छा

कु. श्रीयांश अजय बोराडे

शुभेच्छुक :

पप्पा, मम्मी, आजी, आजोबा, मामा.

मु.पो.दौंडत,ता.इगतपुरी.




# वाहतुकीबाबत उपाययोजना करा

## ट्रान्सपोर्ट असोसिएशनची मागणी



नाशिक । प्रतिनिधी

शहरात सकाळी ९ ते रात्री ८ या वेळेत अवजड वाहतूक बंद करण्याचा निर्णय हा वाहतूकदारांवर अन्यायकारक आहे. केवळ अवजड वाहतूक बंद करून शहरातील वाहतुकीचे प्रश्न सुटणार नाही. त्यासाठी शहरात प्रथमतः वाहतुकीबाबत पायाभूत उपाययोजना करण्यात याव्यात अशी मागणी नाशिक जिल्हा ट्रान्सपोर्ट असोसिएशनच्या वतीने करण्यात आली.

नाशिक शहर वाहतूक विभागाचे सहायक पोलिस आयुक्त नितीन जाधव यांच्या कार्यालयात नाशिक शहरातील अवजड वाहतुकीच्या प्रश्नावर बैठक पार पडली. याप्रसंगी वाहतूक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या समवेत करावयाच्या उपाययोजनाबाबत आढावा घेण्यात आला.

यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाहतूक दिवानसिंग वसावे, नाशिक जिल्हा ट्रान्सपोर्ट असोसिएशनचे चेअरमन राजेंद्र फड, कायदेशीर सल्लागार इंद्रपालसिंग चड्ढा, सचिव बजरंग शर्मा, उपाध्यक्ष शंकरराव धनावडे आणि बस संघटनेचे राजुभाई इंदानी, कैलास शेट यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.पोलिस प्रशासन याबाबत वाहतूकदारांना सर्वोतोपरी सहकार्य करेल. तसेच सुचविलेल्या उपाययोजनांवर लवकर कारवाई करण्यात येईल असे वाहतूक पोलिस सहायक आयुक्त नितीन जाधव यांनी सांगितले.

# ॲड. कदम यांचे कार्य सदैव स्मरणात

### शोकसभेत सर्वपक्षीयांकडून श्रद्धांजली

नाशिकरोड । प्रतिनिधी

ॲड. शांताराम बापू कदम यांनी राजकीय व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून सर्व समाजाला न्याय दिला, त्यांनी केलेले कार्य हे सर्वांच्या स्मरणात राहील, अशा शब्दांत उपस्थित नेत्यांनी कदम यांना श्रद्धांजली वाहिली.

देवळालीगाव येथील म्हसोबा पंच कमिटीचे अध्यक्ष नाशिकरोड व्यापारी बँकेचे माजी अध्यक्ष ॲड. शांताराम बापू कदम यांचे निधन झाल्याने त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी येथील कदम लॉन्समध्ये शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी नाशिकरोड व्यापारी बँकेचे अध्यक्ष दत्ता गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते निवृत्ती अरिंगळे, मनोहर कोरडे, केशव पोरजे, विक्रम कोठुळे, नयना घोलप, सूर्यकांत लवटे, सागर निकाळे, सुनील ढिकले, अरुण जाधव, डी. कोठुळे, ज्ञानेश्वर देवर, शिवाजी हंडोरे योगेश गाडेकर, भय्या मनियार, वसंत पाटील आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन रमेश धोंगडे तसेच तुषार पडोळ, दर्शन सुकेणकर, मंगेश लांडगे यांनी केले.

# बालशिक्षण मंदिर शाळेत तीन समिती

नाशिक । प्रतिनिधी

मविप्र संस्थेच्या बालशिक्षण मंदिर गोरेराम लेन, नाशिक येथे विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी आणि शालेय विकासासाठी तीन महत्वाच्या समित्यांची स्थापना करण्यात आली.

या समित्यांमध्ये सखी सावित्री समिती, महिला तक्रार निवारण समिती तसेच विद्यार्थी सुरक्षा व भौतिक विकसन समिती यांचा समावेश आहे. शालेय व्यवस्थापन समिती व सखी सावित्री समितीचे अध्यक्ष म्हणून राहूल काळे यांची नियुक्ती करण्यात आली. विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकसन समितीच्या अध्यक्षपदी वत्सला खैरे यांची निवड करण्यात आली. महिला तक्रार निवारण समितीच्या अध्यक्षपदी पुनम भोसले यांना नियुक्त करण्यात आले.

पान १ वरून ...

# शिंदेंकडून अपमानाचा बदला!

नाही, असे फडणवीस म्हणाले.

शिवसेनेतून बाहेर पडल्यावर एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्राची सीमा ओलांडली, तेव्हा माझ्याशी संपर्क केला. मी निघालो आहे, असे त्यांनी सांगितले. काळजी करू नका, असे मी त्यांना तेव्हा सांगितले. पुढे काय घडले ते सर्वांना ठाऊक आहे. शिंदे यांनी हिंमत दाखवून जो उठाव केला; त्यानंतर'एकनाथ शिंदेच मुख्यमंत्री होणार' हे पहिल्या दिवसापासूनच ठरले होते. माझ्या किंवा इतर कोणाच्याही मनात दुसरी कुठलीही गोष्ट आली नाही. मी सरकारच्या बाहेर राहणार होतो, पण तुला उपमुख्यमंत्री व्हायचे आहे, असे माझ्या मला पक्षाने सांगितले. मी सरकारमध्ये सहभागी असल्याने आम्ही मजबुतीने सरकार चालवले, असे सांगताना फडणवीस यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला.

देवेंद्र फडणवीस यांनी रेडे कापून आणि मंत्र-तंत्र करून मला मुख्यमंत्रीपदावरून घालवले, असा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला होता. त्यावरही फडणवीस यांनी भाष्य केले. उद्धव ठाकरे यांना प्रचंड नैराश्य आले आहे. त्यामुळेच ते विविध प्रकारची वक्तव्ये करीत आहेत. मंत्र-तंत्र करून कोणाला खुर्चीवरून हटवता येत असेल तर मग निवडणुकांची गरजच काय? निवडणूक आयोगाच्या जागी तंत्र-मंत्र आयोग असता. जो सर्वाधिक रेड्यांचा बळी देईल तो मुख्यमंत्री झाला असता, असा टोला उद्धव ठाकरे यांना लगावताना या सगळ्या अफवा आहेत, त्यांना काही अर्थ नाही, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.